c/1

जा. क्र. उविमम‍ु/ रोपवाटिका/ २९६ /२०२३
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिधुदुर्ग
दिनांक 17 FEB 2023

प्रति,

..................................
..................................
..................................

**विषय : आवळा झाडांची बांडगुळे काढणे व झाडे साफ करणे इत्यादी कामे ठेकापध्दतीने करण्यास दरपत्रक पुरविणेबाबत...**

महाशय,

वरील विषयाबाबत असे कळविण्यात येते की, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे करीता खालीलप्रमाणे आवळा झाडांची बांडगुळे काढणे व झाडे साफ करणे इत्यादी कामे दि.०६/०३/२०२३ ते दि.०६/०४/२०२३ या कालावधीत ठेकापध्दतीने करण्यास दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशिल | अंदाजे झाडे | शेरा |
|---|---|---|---|
| १. | आवळा झाडांची बांडगुळे काढणे व झाडे साफ करुन घेणे | २९० | प्रति झाड दर नमुद करावा. |

याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, कृपया आपण वरील तपशिलाप्रमाणे आवळा झाडांची बांडगुळे काढणे, आवळा झाडे साफ करणे इत्यादी कामे नमुद करून दरपत्रक या कार्यालयात दिनांक 6 / 03/२०२३ पर्यंत प्राप्त होईल अशा तऱ्हेने सादर करावे. उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**दरपत्रकाबाबत अटी खालीलप्रमाणे.**

१) दरपत्रकाचा लखोटा मोहोरबंद करुन त्यावर " **आवळा झाडांची बांडगुळे काढणे, आवळा झाडे साफ करणे इत्यादी कामे**" असे स्पष्ट नमुद करावे.
२) सदरची कामे करताना दुखापत व इजा झाल्यास सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.
३) दरपत्रकातील दर उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ कार्यालयास पोहोच असावेत.
४) दरपत्रक सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ४१६५२० या पत्यावर पाठवावे.
५) दरपत्रकांत या दरपत्रकाच्या संदर्भात उल्लेख असावा.
६) टपालद्वारे दरपत्रक पोहोचण्यास विलंब झाल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.
७) सर्व दरपत्रके मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
८) दरपत्रकावर पॅन नंबर व बॅंक नंबर नमुद करणे अत्यंत आवश्यक आहे.

आपला विश्वासू

**सहयोगी अधिष्ठाता**
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

Scanned with CamScanner